Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XII Issue – II March - April 2023

# इयत्ता 8 वी च्या अप्रगत विद्यार्थ्यांच्या वाचन कौषल्य कारणांचा शोध घेऊन त्यावरील उपाययोजनांची परिणामकारकता अभ्यासणे

**मार्गदर्शक**
**प्रा. डॉ. करण राठोड**
**पी. व्ही. डी. टी. कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वूमेन, चर्चगेट**

**संशोधिका**
श्रीमती अनिता गणेश यादव
**पी. व्ही. डी. टी. कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वूमेन, चर्चगेट**

## सारांश

'वाचन' हे कौशल्य अध्ययनासाठी व ज्ञानग्रहणासाठी उपयुक्त असून सध्याच्या बदलत्या परिस्थितीत व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात मराठी भाषा व वाचन कला मागे टाकून चालणार नाही. तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणणे, त्याची गुणवत्ता वाढीस लागावी म्हणून वाचन कौशल्य क्षमता विद्यार्थ्यांनी साध्य करणे आवश्यक आहे.

संशोधकाला संशोधन कार्याच्या सर्व स्तरामध्ये संबंधित साहित्याचे सर्वेक्षण मार्गदर्शन म्हणून उपयुक्त ठरते. गृहित कृत्यांची निर्मिती, नमुना निवड, माहिती संकलन संख्याशास्त्रीय पद्धतीचा उपयोग, निष्कर्ष काढणे या सर्व बाबींसाठी संदर्भ साहित्याचे सर्वेक्षण उपयोगी पडले.

वरील दोन्ही कृतीसंशोधनात विद्यार्थ्यांना मराठी भाषा वाचनात अडथळा नसून मराठी अक्षरांचा व शब्द उच्चारणात दोष नाहीत ते व्यवस्थित करतात.

संशोधिकेचे संशोधन पूर्णपणे वेगळे आहे. मराठी शाळेत मराठी माध्यम विद्यार्थी व हिंदी भाषिक विद्यार्थी यांना मराठी वाचनच करता येत नाही. त्यांना ते कौशल्य विकसित व्हावे म्हणून पूरक उपक्रम केले त्यामुळे इंटरनेट, शिक्षण क्षेत्रातील विविध विविध साहित्य, वृत्तपत्रे, नियतकालिके या माध्यमाव्दारे संबंधित साहित्याचा आढावा घेतला.

CC BY
*Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's* licensed Based on a work at http://www.goeiirj.com

## प्रस्तावना

'भाषा' ही एक विचार व्यक्त करण्याचे साधन आहे. सर्व प्राण्यांना आपली भारूा असते. परंतू मानव आणि प्राण्यांत खूप अंतर आहे. मानव हा सर्व प्राण्यांमध्ये बुध्दिवान प्राणी आहे.

आपण आपले विचार शब्दांमध्ये मांडू शकतो. परंतू प्राण्यांना ते शक्य नाही आपल्या स्मरण

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XII Issue – II March - April 2023

शक्तीच्या व्दारे आपण वेगवेगळया अनुभवांचा संग्रह करु शकतो आणि या अनुभवांचा भविष्यात आपल्याला उपयोग होतो.

ज्ञान संपादन करणे, ज्ञानसंवर्धन करणे, ज्ञानप्रसार करणे व आपले विचार व भावना यांचे प्रकटीकरणासाठी मातृभाषा हे अत्यंत महत्त्वाचे मुख्य माध्यम आहे. भाषेच्या विकासाशिवाय दैनंदिन व्यवहाराचे व इतर विषयांचे शिक्षण शक्य होत नाही म्हणून मुलांच्या शिक्षणात भाषा शिक्षणास महत्त्वाचे स्थान आहे.

संशोधकाला इयत्ता ८ वी च्या वर्गात अध्यापन करतांना काही ठराविक विद्यार्थी लक्ष न देणे, चुळबूळ करणारी, कावरी बावरी, तर काही उदासिन निरीक्षणात आढळली. स्वत: च्या अनुभवानूसार सदर विद्यार्थ्यांचा मागील वर्षाचा शैक्षणिक वार्षिक निकाल अभ्यासला. या विद्यार्थ्यांबाबत शिक्षिकेकडून चर्चा करुन माहिती मिळवली. या विद्यार्थ्यांना प्राथमिक स्तरावरील वाचन कौशल्य विकसित झाले नसूल यांला मराठी वाचनाकडे कसे वळविता येईल हा विचार मनात आला म्हणून मी कृती संशोधनासाठी इयत्ता ८ वी च्या वाचन कौशल्य अप्रगत विद्यार्थ्यांच्या कारणांचा शोध घेवून त्यावरील उपाययोजना करुन परिणामकारता अभ्यासणे या विषयाची निवड केली.

**संशोधन अभ्यासाची गरज**

'गरज ही शोधाची जननी आहे.' असे म्हटले जाते. मराठी माध्यमाच्या शाळेतही हिंदी भाषिक मुले आहेत व तरे मार्ग मराठी शाळेत प्र. शिक्षिका म्हणून कार्य करतांना विद्यार्थ्यांचे निरिक्षण, मूल्यमापन करतांना असे लक्षात आले की, प्रत्येक इयत्तेत वाचन कौशल्य अप्रगत असे काही ठराविक विद्यार्थी आहेतच त्यामुळे प्रत्येकालाच ही समस्या भेडसावत असून या समस्येवर संशोधन करणे गरजेचे आहे.

या विषयावर संशोधन करुन अनेक विद्यार्थी, शिक्षकांना याचा फायदा होईल असा दृढ विश्वास संशोधिकेला आहे. त्यामुळे संशोधिकेला या विषयावर सांगोपांग विचार व्हावा. विद्यार्थी कविता, गाणी, तोंडी उत्तरे देतात परंतू आशय समजपूर्वक वाचता येत नाही. आत्मविश्वासाने विचारपूर्वक, समाजपूर्वक विचार, मते मांडता येत नाही. यासाठी प्राथमिक स्तरावरचे वाचन कौशल्य, प्रभुत्व मिळणे गरजेचे आहे. योग्य ते निष्कर्ष मिळून विद्यार्थी अनुत्तिर्ण अभ्यासात मागे, शाळा सोडणे, सतत गैरहजर अशी समस्या न निर्माण होता या संशोधनाने अध्ययनात सहजता व सुलभता वाचनाची अभिरुची याची यासाठी या विषयांवर संशोधिकेला संशोधन करणे गरजेचे वाटते.

**संशोधनाचे महत्त्व**

'वाचाल तर वाचाल' शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला शैक्षणिक समस्या

सोडविण्यासाठी कृती घेवून शिक्षक स्थानिक पातळीवर सोडविण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे शाळांतर्गत प्रस्तुत विषयांच्या संशोधनासाठी संशोधकाने इ. ८ वी च्या वर्गातील १५ विद्यार्थी काही मुळाक्षरांची ओळख, बाराखडी, अशुद्ध उच्चारण निवड केली.

विद्यार्थ्यांना वाचन न येणे या कारणांमुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

१. वर्गात विद्यार्थी बेशिस्त वर्तन, उदासिन, अनुत्साही असतात.
२. विद्यार्थी प्रकट वाचन करण्यासाठी आत्मविश्वास गमावतो.
३. अक्षरांची, स्वर उच्चारणाची ओळख नसल्यामुळे विरामचिन्हे उच्चारण न येणे या कारणांने विद्यार्थी चुकीचे वाचन करतो.

**समस्या विधान**

इयत्ता ८ वी च्या अप्रगत विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्य कारणांचा शोध घेऊन त्यावरील उपाययोजनांची परिणामकारकता अभ्यासणे

**संशोधनाची उदिद्ष्टे**

१. इ. ८ वी विद्यार्थ्यांच्या मराठी वाचन कौशल्य अप्रगत कारणांचा शोध घेणे.
२. वाचन करतांना येणाऱ्या अडचणींच्या निराकरणासाठी पूरक उपक्रमांचे आयोजन करणे.
३. विद्यार्थ्यांमध्ये मराठी वाचन कौशल्यांचा विकास यांचा पडताळा घेणे.
४. उपक्रमांची परिणामकारकता अभ्यासणे.

**संशोधनाची गृहीतके -**

प्रस्तुत संशोधनाची गृहितके पुढीलप्रमाणे –

१. विविध सहशालेय उपक्रमांत विद्यार्थी भाग घेतात.
२. विविध उपक्रमांच्या आयोजनानंतर विद्यार्थ्यांत वाचन कौशल्य विकसित करता येते.
३. संगणकाचा वापर करुन परिणामकारकता अभ्यासता येते.
५. विद्यार्थ्यांना चित्रावरुन माहिती सांगता येते.

**संशोधनाच्या कार्यात्मक व्याख्या -**

**१. शाळा -** अनुदानित, खाजगी प्राथमिक सहशिक्षण देणारी माध्यमिक शाळा.

**२. इयत्ता ( ८ वी ) -**

१९९५ च्या शैक्षणिक धोरणानुसार प्राथमिक स्तरावर ५+३+२ हा आकृतीबंधानुसार इयत्ता ८ वी चा माध्यमिक स्तरावरील वर्ग.

**३. विद्यार्थी -**

शालेय केंद्रबिंदू मानला गेलेला व ज्ञानग्रहण करणारा महत्त्वपूर्ण घटक म्हणजे विद्यार्थी.

**४. वाचन -**

भाषेच्या माध्यमात लेखन केलेल्या साहित्यांचे प्रकटीकरण करणे म्हणजेच वाचन होय.

**५. उपाय -**

कोणतेही काम योग्य रितीने यशस्वी होण्यासाठी केलेले प्रयत्न, अडचणी, समस्या निराकरणासाठी केलेले म्हणजेच उपाय योजना होय.

**६. परिणामकारकता -**

केलेल्या कामाचे मोजमाप किंवा एखाद्या समस्येतील कारणांचा शोध घेवून त्यावर उपाय योजना आणि त्यात प्राप्त झालेले यशाचे मोजमाप ही त्या कार्याची परिणामकारकता असते.

**व्याप्ती -**

१. इयत्ता ८ मधील निवडक विद्यार्थी व विद्यार्थीनी एकूण १५ विद्यार्थ्यांचा समावेश केला आहे.

**मर्यादा -**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने फक्त मराठी वाचन अप्रगत विद्यार्थी यांचाच विचार केला आहे. हे संशोधन मराठी वाचन कौशल्य अप्रगत विद्यार्थी यांच्या पुरतेच मर्यादित आहे.

१. समस्येसाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांवर निष्कर्ष काढण्यात आले आहेत.
२. मराठी भाषेतील व्यंजन, स्वरयुक्त शब्द, वाक्यपटट्या, जोडाक्षरे उच्चारण, उतारे वाचन, या घटकांचाच समावेश करण्यात आला आहे.
३. वर्णोच्चार कौशल्य – ८ वी च्या पाठयक्रमातील दोन ते पाच वर्ण असलेल्या शब्दांचा उच्चार करणे पुरतेच मर्यादीत आहे.

**संबंधित साहित्याचा आढावा / सिंहावलोकन -**

**१.शिंदे मिनाक्षी सुनिल -** यांनी 'अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण कालावधीत अवांतर वाचनात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करुन त्यावरील उपाय योजनांची परिणामकारकता अभ्यासणे ' या विषयावर संशोधन केले.

**संशोधनाची उदिद्ष्टे -**

१. प्रशिक्षणार्थींचे अवांतर वाचन किती प्रमाणात आहे याचा शोध घेणे.
२. वाचनाची संधी उपलब्ध न होण्याची कारणे शोधणे.

३. अवांतर वाचनाला मारक ठरणारे घटक शोधून ते दूर करण्यासाठी उपाय योजणे.

४. अवांतर वाचनासाठी ग्रंथालयाचा वापर कसा करावा याची माहिती देणे.

**संशोधनाचे निष्कर्ष -**

१. छात्र अध्यापक फावल्या वेळेचा उपयोग अवांतर वाचनासाठी करतात.

२. छात्र अध्यापकांना वाचनाचे महत्त्व सांगितल्याने साहित्य प्रकारांचे वाचन आवडीने करतात.

**२ लाड शशिकला गंगाराम -**'सत्याग्रह अध्यापक महाविद्यालयातील विद्यार्थी – शिक्षकांना मराठी व्याकरणाचा सराव पाठ घेतांना येणाऱ्या समस्यांचा शोध

'सत्याग्रह अध्यापक महाविद्यालयातील विद्यार्थी – शिक्षकांना मराठी व्याकरणाचा सराव पाठ घेतांना येणाऱ्या समस्यांचा शोध घेवून त्यावरील उपाययोजनांची परिणामकारकता अभ्यासणे.

**संशोधनाची उदि्दष्टे -**

१. विद्यार्थी – शिक्षकांना मराठी व्याकरणाचा सराव पाठ घेतांना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.

२. विद्यार्थी शिक्षकांना मराठी व्याकरणाचा सराव पाठ घेतांना येणाऱ्या अडचणींवर उपाययोजना करणे.

३. विद्यार्थी शिक्षकांना मराठी व्याकरणाचा सराव पाठ घेतांना येणाऱ्या अडचणींवर केलेल्या उपाय योजनांची परिणामकारकता अभ्यासणे.

**संशोधनाचे निष्कर्ष -**

१. सदर संशोधनात विद्यार्थी – शिक्षक सराव पाठ घेतांना चुका करतात हे आढळले. परंतू वारंवार सराव दिल्यावर त्यात सुधारणा दिसून आली.

२. विद्यार्थी शिक्षकांसाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांच्या आयोजनामुळे व त्यांच्या सहभागामुळे त्यांच्या आशयज्ञानात वाढ झाली.

३. शैक्षणिक साहित्याचा प्रदर्शनामुळे त्यांच्यातील कौशल्य व सर्जनशीलता दिसून आली.

**सदर संशोधन पद्धती -**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रायोगिक पद्धतीचा वापर केला आहे. प्रायोगिक संशोधन पद्धतीमध्ये संशोधकाचे लक्ष भविष्याकडे असून या संशोधनात इयत्ता ८ वी च्या अप्रगत विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्य कारणांचा शोध घेऊन त्यावरील उपाययोजनांची परिणामकारकता अभ्यासणे..'' या विषयीच्या तात्कालिन स्थितीचे विश्लेषण करावयाचे असल्याने प्रायोगिक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तसेच येथे आपण

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XII Issue – II March - April 2023

वर्तमान परिस्थितीचा अभ्यास करत असल्यामुळे सर्वेक्षण पद्धतीचा ही सदर कृतीसंशोधनासाठी वापर केला आहे.'

**संशोधनाची साधने**

संशोधनासाठी एखादी समस्या घेतल्यावर समस्येच्या विषयानुसार विविध प्रकारची माहिती संकलित करावी लागते. ही माहिती संशोधिकेला अंतिम निष्कर्ष काढण्यासाठी अत्यावश्यक असते. ही माहिती मिळवण्यासाठी विविध प्रकारची तंत्रे व पद्धती वापरल्या जातात त्या तंत्रांना व पद्धतींनाच संशोधनाची साधने असे म्हणतात. विद्यार्थ्यांशी संवाद साधून, चर्चा करुन व त्याचे निरीक्षण करुन मराठी वाचन न येण्याची कारणे समजून घेतली. दुसऱ्या विषयांबाबत विद्यार्थ्यांची मानसिकता या सहकारी शिक्षकांशी चर्चा केली. मुलाखती, प्रश्नावली ने विद्यार्थ्यांच्या वाचन प्रवृत्ती विषयी माहिती गोळा करण्यात आली. समस्या असणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्रश्न विचारुन मिळवली.

**प्रश्नावली -**

विद्यार्थ्यांना प्रश्नावली देवून प्रश्न विचारुन त्यांचे मत व घरचे वातावरण जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्रश्नांची उत्तरे होय / नाही स्वरुपात असल्यामुळे विद्यार्थ्यांचे विचार जाणून घेणे सोयीचे झाले. पालकसभा घेवून प्रश्नावलीतील माहिती पालकांकडून मिळवली. विद्यार्थ्यांच्या वाचनाची उदासिनता जाणून घेण्यासाठी गरजेचे होते.

**नमुना निवड -**

या संशोधनासाठी संशोधिकेने पदनिश्चयन मापन श्रेणीच्या मदतीने माहितीचे संकलन केले. यासाठी शाळेतील १५ विद्यार्थ्यांची निवड केली.

सदर संशोधन समस्या मराठी विशयाच्या संदर्भात असून इ. ८ वी मध्ये ३५ विद्यार्थी आहेत. त्यातील १५ विद्यार्थ्यांना वाचन करता न येणे समस्या आढळून आली. त्यांचीच निवड म्हणून केली.

**सांख्यिकीची तंत्रे -**

संशोधनात सांख्यिकी तंत्राचा वापर माहितीच्या विश्लेषणासाठी केला जातो. प्रमाण विचलन, वारंवारिता बहुबल केंद्रिय प्रवृत्तीची परिमाणे, टी मूल्य, शतवारी इत्यादी संख्याशास्त्रीय विश्लेषण तंत्रांचा वापर केला जातो. म्हणून संशोधिकेने कृतीसंशोधनातील माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शतवारी या सांख्यिकी तंत्रांचा वापर केला.

**माहितीचे विश्लेषण :-**

माहितीचे संकलन पूर्वचाचणीच्या प्रत्येक प्रश्नाला अनुसरुन संशोधकाने इथे केला आहे. पूर्वचाचणी


व उत्तरचाचणी मधील गुणांचा झालेला बदल पाईचार्ट ( आलेख ) स्वरुपातील चित्र इथे या प्रकरणात मांडला आहे.

**सारणी ४.१**

| प्रश्न १ | एकूण विद्यार्थी संख्या | चाचणी प्रकार | पर्याय | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | होय | नाही | होय | नाही |
| मराठी विषयाची मुळाक्षरे वाचता येतात का ? | १५ | पूर्व चाचणी | ८ | ७ | ५३% | ४७% |
| | १५ | उत्तर चाचणी | १४ | १ | ९३% | ७% |

**अर्थनिर्वचन -**

पूर्व चाचणीत ५३ टक्के विद्यार्थी प्रगती दर्शवित होते. परंतू विद्यार्थ्यांना मुळाक्षरांची ओळख, उच्चारण सराव, साम्य व भेद स्पष्ट करुन दिल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये बरीच प्रगती दिसून आली. त्यांचा भाषिक कौशल्यातील मुळाक्षरांचे वाचन आलेख उत्तर चाचणीत उंचावलेला आहे. म्हणजेच पूर्व चाचणीत फक्त ५३ टक्के विद्यार्थी मुळाक्षरे होती. तर उत्तरचाचणीत ९३ टक्के विद्यार्थी मुळाक्षरे ओळख लागल्याचे दिसून आले.





**आलेख ४.१ पूर्व व उत्तर चाचणी आलेख**

**सारणी ४.२**

| प्रश्न २ | एकूण विद्यार्थी संख्या | चाचणी प्रकार | पर्याय | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | होय | नाही | होय | नाही |
| शब्दपट्ट्यांवरील शब्दांचे उकार दृष्टीक्षेतापात वाचन करतो का ? | १५ | पूर्व चाचणी | ४ | ११ | ५३% | ७३% |
| | १५ | उत्तर चाचणी | १४ | १ | ९३% | ७% |

**अर्थनिर्वचन -**

पूर्व चाचणीत २७ टक्के विद्यार्थी प्रगती दर्शवित होते. परंतू उच्चार क्षमतेचे आकलन, विविध शब्दपट्ट्याव्दारे करुन दिल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये लक्षणीय प्रगती दिसून आली. त्याचा आलेख उत्तर चाचणीत उंचावलेला दिसला. म्हणजेच पूर्व चाचणीत ७३ टक्के विद्यार्थी वाचन करतांना येणाऱ्या अवघड शब्दांचा उच्चार करत नव्हते तर उत्तरचाचणीत ८७ टक्के विद्यार्थी अवघड शब्दांचा उच्चार करु लागले.




**आलेख ४.२ पूर्व व उत्तर चाचणी आलेख**

**माहितीचे अर्थनिर्वचन -**

विद्यार्थ्यांना मुळाक्षरांची ओळख फारच कमी होती.कृती संशोधनातील उपक्रमांव्दारे विद्यार्थ्यांना अक्षरांची ओळख करुन दिल्यामुळे अक्षरांची वाचन क्षमता विकसित झाल्याचे दिसून आले. शाब्दिक खेळांमूळे मराठी

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XII Issue – II March - April 2023

वाचनाविषयी आवड निर्माण झाल्याचे दिसून आले.विद्यार्थ्यांना –हस्व, दिर्घ उच्चारण व्यवस्थित येत नव्हते. वाचन प्रकल्प उपयोजनामुळे उच्चार क्षमता विकसित झाल्याचे दिसून आले.शब्दांची ओळख झाल्यामुळे उपक्रमांचे सरावाने विद्यार्थी स्वत: मौन वाचन करत असल्याचे दिसून आले. बाराखडीचे आकलन झाल्याने प्रश्नमंजुषा मधील उपक्रमांतील पर्याय वाचन करुन उत्तरे सांगू शकले. वाचनाची अभिरुची निर्माण झाली. वाचना संदर्भात दिलेला गृहपाठ विद्यार्थी फारच कमी प्रमाणात करत होते.वाचन उपक्रम राबविल्याने समस्यांचे निराकरण झाल्याने विद्यार्थी आवडीने गृहपाठ करु लागले.

विद्यार्थी प्रथम वाचन करतांना कंटाळा करत होते. सोप्याकडून कठिणाकडे, भेंडया, खेळ इ. उपक्रम राबविल्याने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची अभिरुची निर्माण झाल्याचे दिसून आले.

**संशोधनाचे निष्कर्ष :-**

१)वाचनाविषयी शिक्षक शैक्षणिक साहित्याचा उपयोग करत नाही हे एक प्रमुख कारण असून शैक्षणिक साहित्यात विविधता आणून व वारंवार सराव दिल्यावर त्यात सुधारणा दिसून आली.

२)विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांच्या आयोजनामुळे व त्यांच्या सहभागामुळे त्यांच्यातील आत्मविश्वास वाढला.

३)विविध उपक्रमांच्या आयोजनामुळे व मार्गदर्शनामुळे त्यांच्या वाचनात सुधारणा घडू लागली.

४) भेंडया, प्रश्नमंजुषा, मनोरंजनात्मक खेळ या उपक्रमांमुळे विषयाची वाचनाची आवड निर्माण झाली.

५) कंटाळा करणारे विद्यार्थी व वाचनासाठी उदासिनपणा दूर करण्यासाठी संगणकाचा वापर केल्यावर विद्यार्थ्यांमध्ये अभिरुची वाचनासाठी वाढीस लागली.

६) विद्यार्थ्यांमध्ये वाचनाच्या योग्य सवयी लागल्या. प्रकट वाचन, मौन वाचन, उच्चारण, –हस्व व दीर्घ स्वरांचे उच्चारण विद्यार्थी नियंत्रित काळजीपूर्वक करु लागली.

**संशोधनासाठी शिफारशी :-**

**विद्यार्थी व शिक्षकांसाठी -**

- शिक्षकांनी स्वत: ला वाचनाची सवय लावून घ्यावी.
- भाषा शुद्ध असावी याकडे शिक्षकांने कटाक्षाने पहावे.
- पालकांनी मुलांना वाचनासाठी प्रवृत्त करावे.
- शिक्षकांनी वाचनाविषयीच्या समस्या जाणून त्यावर उपाययोजना करावी.
- विद्यार्थी व शिक्षकांनी विविध उपक्रमांत स्वत: हून सहभाग घ्यावा.

- विविध शैक्षणिक साधनांच्या प्रदर्शनास भेटी द्याव्यात.
- शिक्षकांनी शैक्षणिक समस्या, अडथळयांची चर्चा सहकारी शिक्षकांबरोबर करावी.

**पालकांसाठी -**

- शिक्षणाचे महत्त्व त्यातील वाचनाचे स्थान पालकांनी समजून घ्यावे.
- पालकांनी मुलांना वाचनाचे महत्त्व पटवून द्यावे.
- पालकांनी मुलांना विविध उपक्रमात सहभागी होण्यास परवानगी द्यावी.
- घरातील वातावरण अभ्यासाला पूरक ठेवावे.
- पालकांनी मुलांच्या प्रगतीबाबत काही समस्या असतील तर शिक्षकांना भेटून पाल्यांच्या समस्येचे निराकरण करावे.

**निष्कर्षाचा अन्वयार्थ -**

१. कोणत्याही प्रकारच्या विशेष मार्गदर्शनाअभावी व साहित्य माहितीच्या अभावी विद्यार्थ्यांचा उपक्रमात असहभाग आढळतो म्हणून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शनाची गरज आहे.

२. पालकांचे शिक्षण, वैचारिक पातळी व सहशालेय, उपक्रमाकडे बघण्याची दृष्टी याचा संबंध विद्यार्थी सहभागाशी असतो. पालकांचे उद्बोधन केल्यास पालकांचे प्रोत्साहन मिळवता येते.

३. उपक्रमातील नियोजन त्रुटींचा, उपक्रमातील विविधतेचा संबंध विद्यार्थी सहभागाशी आहे, म्हणून नियोजन व्यवस्थित हेतूपूर्ण असावे.

४. शिक्षकांच्या पक्षपातीपणाची, विद्यार्थ्यांविषयी पूर्वग्रहदूषित मते बाळगण्याचा संबंध विद्यार्थी सहभागाशी दिसून आला.

५. आकर्षक, नवनवीन वाचनविषयीचे उपक्रम राबविल्यामूळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची अभिरुची निर्माण झालेली दिसून आली.

विद्यार्थ्यांना दिलेली चाचणी, प्रश्नावली व निरीक्षणातून असे निदर्शनास आले की, विद्यार्थ्यांना वाचन करता येत नाही. त्यामुळे त्यांना अनेक समस्या निर्माण होत आहेत व पुढील इयत्तेचा, अभ्यासक्रमाची व्याप्ती पाहिले असता प्राथमिक स्तरावरच विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य विकसित होणे गरजेचे आहे. त्यामुळे ही समस्या दूर करण्याचा प्रयत्न केला.

विद्यार्थ्यांची समस्या लक्षात आल्यावर एकूण १५ विद्यार्थ्यांना पूर्वचाचणी देवून समस्यांचा शोध चाचणीद्वारे घेवून त्या दूर करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

उपचारात्मक वर्ग आयोजन, मार्गदर्शन केले, विविध शैक्षणिक साधनांचा वापर केला त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढीस लागला व वाचन कौशल्य विकसित, गुणवत्तेचा विकास विद्यार्थ्यांत दिसू लागला.

**संदर्भग्रंथ सूची**

१. बापट, भा. गो. (१९९५), शैक्षणिक संशोधन. पुणे : नूतन प्रकाशन.
२. भिंताडे, वि. रा. (२००५), शैक्षणिक संशोधन पद्धती. पुणे : नूतन प्रकाशन.
३. देसले, एस्. वाय्., आणि भदाणे, एम्. ए. (२००९). शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र. नाशिक : रेशमाई पब्लिकेशन.
४. देवरे, के. डी. (२००८). शिक्षणशास्त्र. पुणे : निराली प्रकाशन.
५. दूधे, मा. रा. (२००३). शिक्षण संक्रमण. पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
६. जोशी, अ. (१९९९). आशययुक्त अध्यापन. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ.
७. करंदीकरण, सु. रा., आणि मंगरुळकर, मी. बा. (२००३). मराठी आशय अध्यापन पध्दती, कोल्हापूर : फडके प्रकाशन.